ग्रंथमालिका ‘धार्मिक कृतींमागील शास्त्र’ : देवपूजा – खंड ६

# आरती करण्याची शास्त्रशुद्ध पद्धत

मराठी (Marathi)


**संकलक**

**हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे**

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्त्या**

**श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ**


**आणि सुश्री (कु.) मधुरा भिकाजी भोसले**



**सनातन संस्था**

प्रस्तुत पुनर्मुद्रणाच्या २,००० प्रती आणि या
लघुग्रंथाच्या आतापर्यंत ७९,९०० प्रती प्रकाशित !

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्माच्या प्रसारासाठी ‘सनातन संस्थे’ची स्थापना ! (२२ मार्च १९९९)

२. ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाचे जनक ! (वर्ष १९९२)

३. हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

४. ग्रंथ-निर्मिती : फेब्रुवारी २०२५ पर्यंत ३६६ ग्रंथांच्या १३ भाषांत ९९ लाख १० सहस्र प्रती !

५. शारीरिक, मानसिक अन् आध्यात्मिक उपायपद्धतींचे संशोधन

६. हिंदुत्वनिष्ठ ‘सनातन प्रभात’ नियतकालिकांचे संस्थापक-संपादक ! (३० एप्रिल १९९८ ते १९ एप्रिल २००० पर्यंत)

७. ‘हिंदु राष्ट्रा’च्या स्थापनेसाठी हिंदुत्वनिष्ठांना दिशादर्शन !

८. भारतीय संस्कृतीच्या जागतिक प्रसारार्थ ‘भारत गौरव पुरस्कार’ देऊन फ्रान्सच्या संसदेत सन्मान (५ जून २०२४)

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – ‘www.Sanatan.org’.)**

# सनातनच्या सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्त्यांचे अद्वितीयत्व !



श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ



सुश्री (कु.) मधुरा भिकाजी भोसले

सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्ते पृथ्वीवर कुठेही उपलब्ध नसलेले अध्यात्मातील विविध विषयांवरील सखोल अध्यात्मशास्त्रीय ज्ञान सूक्ष्मातून मिळवतात. वर्ष २००३ पासून त्यांना मिळणारे हे ज्ञान सनातनच्या साधारणपणे ६० हून अधिक ग्रंथांत घेतले आहे. ईश्वराकडून मिळणारे हे ज्ञान ग्रहण करण्यासाठी त्यांना वाईट शक्तींच्या आक्रमणांनाही तोंड द्यावे लागते. असे असले, तरी गुरुकृपेच्या बळावर ते ही सेवा करतच आहेत.

---

## लघुग्रंथ वाचण्यास आरंभ करण्यापूर्वी पुढील प्रार्थना करा !

हे कुलदेवते (स्वतःच्या कुलदेवतेचे नाव घ्यावे), उपास्यदेवते (स्वतःच्या उपास्यदेवतेचे नाव घ्यावे) आणि गुरुदेवा (गुरु असल्यास), आपल्या कृपेने या लघुग्रंथातील विषय मला नीट समजू दे अन् त्यानुसार मला योग्य आचरणही करता येऊ दे.

# अनुक्रमणिका


卐 **मनोगत** ८

卐 **प्रस्तुत लघुग्रंथाचे असामान्यत्व लक्षात घ्या !** १०

卐 प्रकरण १. आरतीचे महत्त्व १२

卐 प्रकरण २. आरती कधी करावी ? १६

卐 प्रकरण ३. आरती करण्याची संपूर्ण कृती १८

卐 प्रकरण ४. आरतीच्या कृतींमागील शास्त्र २३

卐 प्रकरण ५. आरतीच्या वेळी आलेल्या काही अनुभूती ६३

卐 **संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन अन् अन्य** ६७



**गणेशभक्तांसाठी सनातनचा लघुग्रंथ !**

**श्री गणेश पूजाविधी (काही मंत्रांच्या अर्थासह)**

अर्थ जाणून पूजाविधी केल्यास तो अधिक भावपूर्ण होऊन देवतेची कृपा होते. यात श्री गणेश पूजाविधी अर्थासह दिला आहे.

# मनोगत

उपासकाला हृदयातील भक्तीदीप तेजोमय करण्याची आणि देवतेकडून कृपाशीर्वाद ग्रहण करण्याची सुलभ पर्वणी म्हणजे ‘आरती’. संतांच्या संकल्पशक्तीने सिद्ध असलेल्या आरत्या म्हटल्याने वरील उद्देश निःसंशय सफल होतात, पण तेव्हाच जेव्हा आरत्या हृदयातून, म्हणजेच आर्ततेने, तळमळीने आणि अध्यात्मशास्त्रदृष्ट्या योग्य रीतीने म्हटल्या जातात.

एखादी गोष्ट आपल्याकडून आर्ततेने, म्हणजे अंतःकरणपूर्वक तेव्हाच होते, जेव्हा तिचे महत्त्व आपल्या मनावर बिंबते. त्या गोष्टीमागील शास्त्र वा सिद्धान्त सांगितल्यास तिचे महत्त्व लवकर पटते. याच उद्देशाने या लघुग्रंथात आरती करतांना करावयाच्या विविध कृतींमागील अध्यात्मशास्त्र दिले आहे. उपासना करतांना कोणतीही कृती अध्यात्मशास्त्रदृष्ट्या योग्य करणे अत्यावश्यक असते; कारण अशा कृतीचेच परिपूर्ण फळ मिळते.

सध्याचे धावपळीचे जीवन, उपलब्ध साधनसामुग्री, तिची

शुद्धता इत्यादी गोष्टी लक्षात घेता सर्वांनाच कर्मकांडानुसार आरती करणे १०० टक्के जमेल, असे नाही. त्यामुळे सर्वसामान्य व्यक्तीला तिच्या घरात ‘साधना’ म्हणून करता येतील, अशा आरतीशी संबंधित काही सोप्या कृती प्रस्तुत लघुग्रंथात सांगितल्या आहेत. तसेच देवाला आरती ओवाळतांना ती देवाच्या अनाहत ते आज्ञा चक्रापर्यंत ओवाळावी, आरतीच्या वेळी टाळ्या हळुवारपणे वाजवाव्यात, आरतीनंतर प्रदक्षिणा आवर्जून घालाव्यात, यांसारख्या गोष्टी बहुतेकांना ठाऊक नसतात किंवा त्यांच्याकडून त्या अयोग्यरित्या होत असतात. या लघुग्रंथामुळे ‘विविध कृती योग्यरित्या कशा करायच्या ? आणि त्यामागील अध्यात्मशास्त्र काय ?’, हे कळेल.

या लघुग्रंथात दिलेले शास्त्र जाणून त्यानुसार आरती करून प्रत्येकाची अधिकाधिक भावजागृती होवो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक** F (LG-D7E)

**टीप** लघुग्रंथाच्या शेवटी इंग्रजी अक्षरांत दिलेला संकेतांक हा केवळ कार्यालयीन सोयीसाठी आहे. त्याचा लिखाणाशी संबंध नाही.